पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०८७** **दि. २५ /०९ /२०१९**

## मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.

## पोलीसांनी दाखविलेल्या कर्तव्यदक्षतेमुळे चोरीस गेली स्कॉर्पिओ गाडी २४ तासाचे आत मुळ मालकास परत मिळवून दिली.

संतोष सुधाकर बधे, रा. बधे वस्ती, केशवनगर, मुंढवा, पुणे यांचा बिल्डींग मटेरीयल सप्लायर्सचा व्यवसाय असून, ते दि. २२/०९/२०१९ रोजी त्याचे कामकाज उरकून रात्रौ ०७.०० वा घरी आले व त्याचे जवळ असलेली स्कॉर्पीओ गाडी नं. एम.एच. १५, बी.डी. ०१४४ ही त्यांनी पार्कींगमध्ये पार्क केली होती. परंतु, दुसरे दिवशी दि. २३/०९/२०१९ रोजी सकाळी ०७.०० वा त्यांना कामाकरीता बाहेर जावयाचे असल्याने ते त्यांचे स्कॉर्पीओ गाडीपार्क केलेल्या ठिकाणी गेले असता, त्यांना गाडी पार्कींगमध्ये दिसून आली नाही. तेव्हा त्यांनी मुलांकडे गाडी बाहेर नेली आहे काय याबाबत चौकशी करता, मुलांनीही नकार दिल्याने व त्यांनी गाडीची आजूबाजूस चौकशी करता, काहीएक माहिती मिळून न आल्याने व स्कॉर्पीओ गाडी चोरी झालेबाबत त्यांची खात्री झाले नंतर संतोष बधे यांनी तात्काळ मुंढवा पोलीस ठाणे येथे येवून पोलीस उप निरीक्षक, डी.टी.कांबळे यांना सर्व हकीगत सांगितलेने संबंधित अधिकारी यांनी तात्काळ स्कॉर्पीओ गाडी चोरीबाबत ऑनलाईन तक्रार नोंदवून घेवून त्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संपतराव भोसले, मुंढवा पोलीस ठाणे यांना माहिती दिली असता, पुढील तपास पोलीस उप निरीक्षक, अमोल गवळी व पथकास तात्काळ स्कॉर्पीओ गाडीचा तपास करणेबाबत सुचनासह मार्गदर्शन केलेप्रमाणे तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक, अमोल गवळी व कर्मचारी सपोफौ सोनवणे, पोहवा २०३९ चव्हाण, पोहवा पवार, पोना २५३२ जगताप, पो.शि ७७०० कांबळे यांनी तात्काळ गाडीचे चोरीचे ठिकाणी जावून व आजूबाजूचे सी.सी.टी.व्ही. फुटेजचे आधारे व बातमीदारामार्फत माहिती प्राप्त करुन गाडीचा शोध घेतला असता, गाडी मांजरी रोड मार्गे वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट, मांजरी याचे जवळपास असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने वर नमूद अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट व परिसरामध्ये शोध घेतला असता, स्कॉर्पीओ गाडी ही सदर इन्स्टीटयुचे पाठीमागील बाजूस मिळून आली. परंतु, सदर गाडी कोणी चोरुन आणली याची खात्री करणेकरीता पोलीस उप निरीक्षक, अमोल गवळी व पथकाने सापळा रचला असता दि. २४/०९/२०१९ रोजीपर्यंत कोणीही गाडीचे जवळपास आले नसल्याने सदरची गाडी तात्काळ ताब्यात घेवून मुंढवा पोलीस ठाणे येथे आणूव सदर गाडीचे मुळ मालक संतोष बधे यांना मुंढवा पोलीस ठाणे येथे बोलावून सदरची गाडी आज रोजी मुळ मालकास परत करण्यात आलेली आहे.

सदर चोरीस गेले स्कॉर्पीओ गाडीचा शोध वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संपतराव डी. भोसले यांचे मार्गदर्शनाखालील पोलीस उप निरीक्षक, अमोल गवळी, व कर्मचारी सहा. पोलीस फौजदार सोनवणे, पोहवा चव्हाण, पोहवा पवार, पोना जगताप, पोशि कांबळे यांनी केला आहे.


MAHARASHTRA 15.BD
0144